# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनुदानाचा हिस्सा देण्याबाबत

**(१) ८६५७ (२०-०७-२०२१) श्री.कपिल पाटील : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ३९७२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अनुदानास पात्र असलेल्या खाजगी प्राथमिक शाळांना शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेला अनुदानाचा हिस्सा दिला नसल्याने सदर शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतरांना अनुदान मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मानधन नसल्यामुळे कोविड-१९ च्या लॉकडाऊन काळात त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनुदानाचा हिस्सा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०७-०३-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या स्तरावरुन मान्यता दिलेल्या खाजगी प्राथमिक शाळांना अनुदान ग्राह्य धरण्यात येणार नसल्याचे शासन स्तरावरुन आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अल्पसंख्यांक शाळांना अनुदान व तुकड्या कायम ठेवण्यासाठी वीस विद्यार्थ्यांची असलेली अट शिथिल करण्याबाबत

**(२) ८७९९ (२०-०७-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अल्पसंख्यांक शाळांना अनुदान व तुकड्या कायम ठेवण्यासाठी वीस विद्यार्थी असलेल्या अटीला शिथिलता देण्यासाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने शासनाने निर्णय घेण्याबाबत दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या निर्णयानुसार सूचित केल्याचे माहे मे, २०२१ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड (०७-०३-२०२२) :** (१) व (२) मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल रिट याचिका क्र.९९६७/२०१३ मध्ये दिनांक १२/०८/२०१६ रोजी निर्णय देऊन मुल्यांकनाच्या दिनांक १५/११/२०११ च्या शासन निर्णयात दुरुस्ती करण्याबाबत निर्णय दिला आहे.

तथापि, मा.सर्वोच्च न्यायालय येथे दाखल स्पेशल लीव्ह पिटीशन क्र.११६३९-११६४०/२०१६ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०९/१२/२०१६ अन्वये अनुदानाच्या निकषासाठी शासन निर्णय, दिनांक १५/११/२०११ नुसार

कार्यवाही करण्याबाबतचा आदेश देण्यात आला आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाच्या दिनांक १२/०८/२०१६ च्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला, वाशिम व बुलढाणा या तीन जिल्ह्यात रेमडेसिविर इंजेक्शन व प्रतिबंधात्मक लसीचा पुरवठा करणेबाबत

**(३) ८९३९ (२२-०६-२०२१)** : सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशात कोरोना महामारीची दुसरी लाट आली असून तिसरी लाट येण्याची शक्यता असल्याच्या पार्श्वभूमीवर अकोला, वाशिम व बुलढाणा या तीन जिल्ह्यात कोरोना महामारीसाठी प्रतिबंध उपाययोजना म्हणून दिले जाणाऱ्या रेमडेसिविर इंजेक्शनचा तुटवडा होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तीन जिल्ह्यांना रेमडेसिविर इंजेक्शनचा समान पुरवठा करण्याबाबत शासन कार्यवाही करणार आहे काय, तसेच अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्ह्यात कोरोना महामारी प्रतिबंधात्मक लस देण्याचा कार्यक्रम सुरू असून लसीचा पहिला डोस दिल्यानंतर दुसरा डोस देतांना अनियमितता होत असून लाभार्थी संख्येच्या प्रमाणात लसींचा तुटवडा होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने लसीचा पहिला डोस घेतल्यानंतर दुसऱ्या डोसमध्ये होणारी अनियमितता दूर करुन लाभार्थी संख्येच्या प्रमाणात लसींचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (१०-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) सद्य:स्थितीत या तीनही जिल्ह्यात रेमडेसिवीर इंजेक्शनचा साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. केंद्र शासनाकडून राज्य शासनाला कोविड लसीचा पुरवठा वेळोवळी करण्यात येतो. त्यामुळे ज्या प्रमाणात लसी

राज्याला उपलब्ध होतात, त्यानुसार राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये लाभार्थी संख्येच्या प्रमाणात लसींचा पुरवठा करून लाभार्थ्यांचे लसीकरण करण्यात येत आहे.

(३) लसींचा पुरवठा होण्यासाठी राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. उपलब्धतेप्रमाणे दुसरा डोस देय असलेल्या लाभार्थ्यांच्या संख्येनुसार दुसरा डोस दिला जात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी बालभारतीमार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रश्नसंचात चुका आढळल्याबाबत

**(४) ९२६२ (२०-०७-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी परिक्षेच्या सरावासाठी प्रश्नसंच उपलब्ध करुन दिल्याचे दिनांक १६ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण (बालभारती) परिषदेने ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध केलेल्या प्रश्नसंचामध्ये काही प्रश्न एकापेक्षा जास्त वेळा तर काही प्रश्न शासनाने वगळण्यात आलेल्या अभ्यासक्रमाबाबत प्रसिध्द केले असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रश्नसंच तयार करतांना त्या-त्या विषयाच्या अभ्यास मंडळातील सदस्यांना सहभागी करुन घेतले नसल्याचे तसेच आवश्यक ती छाननी प्रक्रिया न राबविताच प्रश्नसंच प्रसिध्द करण्यात आल्याचे अभ्यास मंडळाचे माजी सदस्यांकडून सांगण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१०-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) अंतर्गत शिक्षकांच्या समायोजनाबाबत

**(५) ९२९० (२०-०७-२०२१) डॉ.रणजित पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासन पुरस्कृत राज्यात अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) अंतर्गत कार्यरत १३५८ विशेष शिक्षकांच्या समायोजनाचा प्रस्ताव शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांनी दिनांक २९ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे सादर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांनी दिनांक २५/०८/२०१६ रोजी निर्णय देवून विशेष शिक्षकांचे समायोजन करण्याच्या दिलेल्या आदेशानुसार तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांनी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे तात्काळ अनुपालन करावे असे निर्देश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यातील शाळांमधील घटलेल्या विद्यार्थी संख्येमुळे नवी मुंबईसह राज्यात हजारो शिक्षक अतिरिक्त ठरल्याने त्यांचे समायोजन करण्याचे आदेश शिक्षण संचालनालयाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अतिरिक्त शिक्षकांना आपली मूळ शाळा सोडून घरापासून दूर जावे लागणार असल्याने संबंधित शिक्षक अपंगत्व, पती-पत्नी विलगीकरण, कौटुंबिक आजारपण व सेवाज्येष्ठता यामुळे संभ्रमावस्थेत सापडले आहेत, हे ही खरे आहे का,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार व मा.मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार विशेष शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०८-०३-२०२२) :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे. मा.न्यायालयाने विशेष शिक्षकांचे उपस्थितीचे दस्तऐवज तपासून वेतन अदा करणेबाबत निर्देश दिले आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई स्तरावरील तपासणी पथकांच्या तपासणीमध्ये पात्र ठरलेल्या विशेष शिक्षकांना समग्र शिक्षा योजनेच्या अटी/शर्तीनुसार तालुका स्तरावर पदस्थापना देण्यात आल्या आहेत. तथापि, सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाहन पार्किंग करण्यासाठी जागा उपलब्ध असल्याचा पुरावा दिल्यानंतर ग्राहकास वाहन खरेदीची परवानगी देण्याबाबत

**(६) ११५६२ (०६-०१-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वाहन खरेदी करणाऱ्या ग्राहकाने त्यांच्याकडे पार्किंग करण्यासाठी जागा उपलब्ध असल्याचा पुरावा दिल्याशिवाय वाहन खरेदी करण्याची परवानगी देण्यात येणार नाही, असे धोरण आखण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे तसेच सदर धोरणाबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०३-०३-२०२२) :** (१) नाही.

मोटार वाहन अधिनियम, १९८८ व त्या अंतर्गत नियमांमध्ये वाहनाच्या नोंदणीवर निर्बंध नसल्याने वाहनाची नोंदणी नाकारता येत नाही. मोटार वाहन कायदा व त्याअंतर्गत नियमात पार्किंगची जागा नसल्यास वाहनाची नोंदणी नाकारण्याची तरतूद नाही.
(२) सदर धोरणात्मक बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शिक्षण विभागातील अनुकंपा नियुक्तीसंदर्भातील प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(७) १२१४८ (०१-०३-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शिक्षण विभागातर्फे अनुकंपा भरतीत दिरंगाई करण्याचे धोरण अवलंबिण्यात येत असल्याबाबत २५ शाळा संस्थाचालक व मुख्याध्यापकांना नोटीस दिल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२२ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यात करोना व इतर आजाराने मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या किती नातेवाईकांचे नोकरीसाठी अर्ज प्राप्त झाले आहेत, तसेच, अनुकंपा नियुक्तीचे अर्ज तातडीने निकाली न काढण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१५-०३-२०२२) :** (१) २५ शाळांच्या मुख्याध्यापक व संस्थाचालकांना अनुकंपा नियुक्तीसंदर्भात कार्यवाही करण्याबाबत पत्राने कळविले आहे.
(२) नागपूर जिल्ह्यात करोना व इतर आजाराने मृत्यू पावलेल्या ११९ कर्मचाऱ्यांपैकी ८२ मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांचे नोकरीसाठी अर्ज प्राप्त झाले आहेत.
(३) अनुकंपा नियुक्तीचे अर्ज तातडीने निकाली काढण्याच्या सूचना संबंधित संस्थाचालक व मुख्याध्यापकांना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विदर्भासह राज्यातील आदिवासी भागात धान खरेदी केंद्रे सुरु करण्याबाबत

**(८) १३०७१ (२२-०२-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भासह राज्यातील आदिवासी भागात माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान पासून धान खरेदी केंद्रे सुरु होणे अपेक्षित असतानाही अद्यापही धान खरेदी केंद्रे सुरु झाली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धान खरेदी केंद्रे सुरु झाली नसल्यामुळे आदिवासी भागातील धान उत्पादक शेतकरी अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने शासनाने निर्णय घेवून विदर्भासह राज्यातील आदिवासी भागात धान खरेदी केंद्रे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. के.सी.पाडवी (१०-०३-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.

दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार विदर्भासह राज्यामध्ये माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी एकूण २९८ खरेदी

केंद्र मंजूर केलेली आहेत. मात्र शेतकऱ्यांनी धानाची कापणी उशिराने केलेली असून खरेदी केंद्रावर माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये शेतकऱ्यांनी उशिरा धान विक्री करीता आणलेला असून त्यामुळे धानाची खरेदी उशिराने झालेली आहे. आजमितीस २९८ मंजूर खरेदी केंद्रापैकी २५९ खरेदी केंद्रावर १२०५३० शेतकऱ्यांकडून ३५३५०१३.८५ क्विंटल धानाची खरेदी दिनांक १८/२/२०२२ अखेर करण्यात आलेली आहे. धान खरेदी केंद्र उशिराने सुरू झाल्याबाबत कोणत्याही शेतकऱ्याची तक्रार महामंडळाकडे प्राप्त झालेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पाचपावली (जि.नागपूर) उड्डाण पुलाची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(९) १३०८३ (०३-०३-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाचपावली (जि.नागपूर) येथील उत्तर व पूर्व नागपूरला जोडणाऱ्या उड्डाण पूल जुना व जीर्ण झाल्याने पुलाची दुरवस्था झाली असून कमाल चौक ते गोळीबार चौकापर्यंत असलेल्या पुलाच्या गर्डरची जोडणी निघाल्याचे दिनांक १० डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पूल जीर्ण झाल्याने त्या ठिकाणी नवीन पूल बांधण्याबाबत नागरिकांनी शासनाच्या संबंधित विभागाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पाचपावली येथील उड्डाण पुलाची पुनर्बांधणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-०३-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.
नागपूर येथील उत्तर व पूर्व नागपूरला जोडणाऱ्या रेल्वे उड्डाणपूल (ROB) चे बांधकाम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग विभाग क्र.१४ यांचेकडून करण्यात आले आहे. या उड्डाणपूलाची दुरवस्था झाली नसून पुलाचे

स्ट्रक्चरल ऑडीट तातडीने करणे आवश्यक आहे. पुलाचे बेअरींग्ज, Expansion Joints व Wearing Coat इत्यादीची कामे सुध्दा करणे आवश्यक आहे. तसेच या उड्डाणपूलावरील खड्डे भरणे व डांबरीकरण करणे इत्यादी कामे महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) नागपूर येथील इंदिरा चौक ते शितलामाता मंदीरापर्यंत नवीन उड्डाणपूल भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण मार्फत बांधण्याकरीता प्रस्तावित असून या प्रस्तावामध्ये पाचपावली रेल्वे उड्डाणपूल चा समावेश आहे. या संपूर्ण कामाकरीता रुपये ५२५.३३ कोटी इतक्या रकमेचा सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) मान्यता देण्याची भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्याकडे सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कृषी कर्ज माफ केलेल्या शेतकऱ्यांना नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज वसुलीची नोटीस पाठविण्यात येत असल्याबाबत

**(१०) १३१८४ (०९-०३-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांचे थकीत असलेले कृषी कर्ज शासनाने सन २०१७-२०१८ या कालावधीत माफ करण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने शासनाच्या निर्णयानुसार सदर कालावधीत थकीत असलेल्या कृषी कर्ज वसुलीकरीता जप्ती कारवाईच्या नोटीसा शेतकऱ्यांना पाठविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित शेतकऱ्यांना बजाविण्यात आलेल्या जप्ती कारवाईच्या नोटीसा परत घ्याव्या याकरीता नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांना उचित निर्देश देवून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१६-०३-२०२२) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ व महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ या अंतर्गत जे शेतकरी अपात्र ठरले आहेत, अशा थकीत शेतकरी कर्जदाराविरुध्द वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वरंध (ता.महाड, जि.रायगड) भागातील दहीवड-वाकी-शेवते रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(११) १३१८८ (२३-०२-२०२२) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरंध (ता.महाड, जि.रायगड) भागात दिनांक २१ ते २३ जुलै, २०२१ या कालावधीत झालेल्या ढगफुटीमुळे डोंगरातील दरडी खाली येऊन दहीवड-वाकी-शेवते रस्ता वाहून गेल्याने रस्ता पूर्णपणे वाहतुकीसाठी बंद झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे कामाला वन विभागाची परवानगी मिळाली नसल्यामुळे निधी उपलब्ध असतानाही रस्त्याच्या दुरुस्तीचे काम होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामस्थांची दळणवळणाच्या दृष्टीने गैरसोय होत असून ग्रामस्थांनी रस्त्याची दुरुस्ती करुन रस्ता वाहतुकीसाठी उपलब्ध करुन देण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू रस्त्याची दुरुस्ती करुन रस्ता वाहतुकीसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (०९-०३-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) प्रश्नांकित रस्त्याच्या दुरुस्तीबाबत ग्रामस्थांनी उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, महाड यांना प्रत्यक्ष भेटून विनंती केली आहे.

(४) प्रश्नांकित दहिवड वाकी शेवते रस्ता रा.मा.१०६ या रस्त्यावरील कि.मी. ६/२०० मधील अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त झालेला भाग तात्पुरता दुरुस्त करुन हलक्या वाहनांची वाहतूक सुरु करण्यात आली आहे.

कायमस्वरुपी दुरुस्ती करीता मंजूर काम वन विभागाची परवानगी प्राप्त करुन पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रत्नागिरी (जि.खेड) येथील लोटे एमआयडीसीमधील रासायनिक कंपन्या नियमांचे उल्लंघन करित असल्याबाबत

**(१२) १३२५१ (२५-०२-२०२२) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी (जि.खेड) येथील लोटे एमआयडीसीमधील रासायनिक कंपन्यांमधील रासायनिक सांडपाण्यावर प्रक्रिया करुन ते पाणी पाईपलाईनद्वारे खोल खाडीत सोडणे आवश्यक असताना अनेक रासायनिक कंपन्या नियमांचे उल्लंघन करुन सदरहू सांडपाणी लोटे एमआयडीसी परिसरातून वाहणाऱ्या ओढे आणि नाल्यांमध्ये सोडत असल्याने लोटे, घाणेकुंट, कोतवली असगणी आदी गावांमध्ये प्रदुषणात वाढ झाल्याने गावांवर स्थलांतराची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत दूषित झाल्याने सदरहू गावांना महिन्यातून एक ते दोन वेळा पाणीपुरवठा होत असल्याने पाणीटंचाई निर्माण झाली आहे, तर शेकडो हेक्टर आंबा, काजूच्या झाडांचे नुकसान झाले असून नाल्यातील जलचर नष्ट झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रदूषणाबाबत मागील २ वर्षांपासून येथील ग्रामस्थांनी महाराष्ट्र प्रदूषण मंडळ, मा.पर्यावरण मंत्री, मा.पालकमंत्री, रत्नागिरी जिल्हा यांच्याकडे तक्रारी करूनही प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याच्यादृष्टीने शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पर्यावरणाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सदरहू रासायनिक कंपन्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) लोटे एमआयडीसीमधील रासायनिक कंपन्यांमधील प्रदूषणाबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत संबंधित उद्योगांची पाहणी करून दोषी आढळणाऱ्या उद्योगांवर वेळोवेळी कारवाई करण्यात आली आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने लोटे एमआयडीसीमधील उद्योगांना दिलेल्या संमतीपत्रामधील अटींचे उल्लंघन करणाऱ्या ०५ उद्योगांना प्रस्तावित आदेश, ०३ उद्योगांना बंदचे आदेश व एका उद्योगास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

तसेच सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेमधून सोडण्यात येणाऱ्या प्रक्रियायुक्त सांडपाण्याची गुणवत्ता विहित मर्यादेत येत नसल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेला वेळोवळी प्रस्तावित आदेश बजावण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मोखाडा (जि.पालघर) ते शहापूर (जि.ठाणे) तालुक्याला जोडणाऱ्या वैतरणा नदीवर पूल बांधण्याबाबत

**(१३) १३२८३ (०१-०३-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोखाडा-शहापूर दरम्यानच्या वैतरणा नदीवर पूल नसल्यामुळे सावर्डे (ता.मोखाडा, जि.पालघर) या आदिवासी गावासह या भागातील काष्टी, किनस्ते, पोर्याचा पाडा, हट्टीपाडा, दुधगाव व मारूतीची वाडी येथे राहणाऱ्या ग्रामस्थ, विद्यार्थी, महिला, रुग्ण यांना पुलाअभावी उंबरमाळी रेल्वे स्थानक,

खर्डी, शहापूरची बाजारपेठ पर्यंत जाण्यासाठी शहापूर व मोखाडा तालुक्याला जोडणाऱ्या लाकडाच्या ओंडक्यावरून धोकादायक प्रवास करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर तालुक्यातील दापूर, सावरखुट, बांदलवाडी,अजनुप, उटाळा, बोंडारपाडा, काटीचा पाडा, कोळीपाडा येथील ग्रामस्थांनाही पुलाअभावी मोखाडा तालुक्यात जाण्यासाठी याच ओंडक्यावरुन धोकादायक प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वैतरणा नदीवर टाकलेल्या या ओंडक्यावरुन धोकादायक प्रवास करतांना सावर्डे गावातील अनेक ग्रामस्थांना जीव गमवावा लागला आहे, तसेच अनेक म्हशी, गाई व बैल यांच्याही पाय घसरुन मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शहापूर व मोखाडा तालुक्याला जोडणाऱ्या वैतरणा नदीवरील पूल उभारण्याकरीता सावर्डे ग्रामपंचायतीने अनेकवेळा ठराव पारित करुन मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री, पालघर, जिल्हाधिकारी, पालघर, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मोखाडा व तहसिलदार, मोखाडा यांचेकडे सादर केला आहे, तसेच लोकप्रतिनिधी, विविध संघटना व या परिसरातील ग्रामस्थांनी पूल उभारण्याबाबत लेखी निवेदनाद्वारे शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वैतरणा नदीवर पूल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१६-०३-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) जानेवारी, २०२२ मध्ये यासंदर्भात बातमी प्रसिध्द झाली होती, हे खरे आहे.

(५) जव्हार तालुक्यातील सावर्डे दापोरा हा रस्ता योजनाबाह्य रस्ता असून सदर रस्त्याची लांबी १.०० कि.मी. आहे. सदरचा रस्ता महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना मार्फत तयार करण्यात आला आहे. वर्तमान पत्रातील

बातमीची दखल घेऊन जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडून सदर रस्त्यातील वैतरणा नदीपात्रावर तात्पुरत्या स्वरुपात नदी ओलांडून दापोरा येथे जाण्यासाठी रुपये १४,९९,९९९ लक्ष किंमतीच्या पादचारी पुलाचे काम मंजूर करण्यात आले आहे. सदर कामाची ई-निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तोंडवली फाटा ते वाघेश्वर मंदिर, तोंडवली (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(१४) १३२८६ (०३-०३-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तोंडवली फाटा ते वाघेश्वर मंदिर, तोंडवली (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) या सुमारे ७ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची खड्ड्यांमुळे दुरवस्था झाल्याने या रस्त्यावरुन प्रवास करणाऱ्या दुचाकी, रिक्षा, कार इ. वाहनांना धोकादायक प्रवास करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रस्त्याचे मजबूतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी येथील ग्रामस्थांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कणकवली व उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे मागील २ वर्षापासून लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (१५-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही.

रस्ता सर्वसाधारणपणे वाहतूकीकरीता सुस्थितीत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) या रस्त्याच्या ९.५०० कि.मी. च्या लांबीपैकी विशेष दुरुस्ती अंतर्गत ४.२५० कि.मी. या लांबीमध्ये नुतनीकरणाचे काम प्रगतीत आहे.

उर्वरित रस्त्याचे काम हे निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहिल.

---

## राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्याबाबत

**(१५) १३५११ (०२-०३-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन उच्च शिक्षण घेता यावे याकरीता सन १९६० पासून केंद्र व राज्य शासनाच्या निधीच्या तरतुदीतून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती ही योजना सुरू करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१७ ते सन २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या एकूण निधीपैकी रूपये ८८१ कोटी निधी अखर्चित राहिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाने राज्य शासनाला निधी दिला असूनही राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीपासून वंचित रहाण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील मागासवर्गीय मॅट्रीकोत्तर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२१-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र बांबू विकास मंडळाने केलेल्या बेकायदेशीर प्रक्रियेमुळे पर्यावरणाला धोका निर्माण झाल्याबाबत

**(१६) १३५१४ (०१-०३-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र बांबू विकास मंडळाने गोरेवाडा (जि.नागपूर) जंगलात बांबू प्रक्रियेसाठी रासायनिक उपचार संयंत्र लावण्यात आले असून सयंत्र लावतांना आवश्यक वनसंवर्धन अधिनियम १९८० जलप्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण अधिनियम १९७४ आणि वायू प्रदूषण १९८१ च्या तरतुदीचे पालन केलेले दिसून येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १३ ऑक्टोबर, २०२० रोजी बेकायदेशीर चालविण्यात येणाऱ्या बांबू प्रक्रिया केंद्रातील दबाव वाहिणीत स्फोट होवून विषारी रासायनिक सांडपाणी जवळच्या पाण्यात नदीस्त्रोतात गेल्यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय हरित लवादाने दिनांक २८ जानेवारी, २०२२ रोजी याबाबत दखल घेवून सबंधित सर्व विभागाला नोटीस पाठवून चार आठवड्यात उत्तर सादर करणेबाबत आदेश दिले असूनही याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नोटीस पाठविलेले सर्व विभाग तथा महाराष्ट्र बांबू विकास मंडळावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१६-०३-२०२२) :** (१) महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर येथील कार्यालयीन परिसरात बांबूवर प्रक्रिया व संशोधन करण्याकरीता Vacuum Pressure Impregnation (VPI) मशीन बसविली होती. वन संवर्धन, विकास व व्यवस्थापन या बाबी वानिकी प्रयोजन समजण्यात येतात व त्याकरीता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या तरतूदी लागू होत नाही. तथापि, सदरचा प्रकल्प जरी वन संवर्धन व विकासाकरीता आवश्यक असला तरी या प्रकल्पाकरीता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या तरतूदींचा भंग होतो किंवा नाही याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात येत आहे.

जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९७४ आणि हवा (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९८१ च्या तरतुदीचे भंग झाल्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कारवाई सुरु आहे.

(२) दिनांक १३/१०/२०२० रोजी Vacuum Pressure Impregnation मशीन मध्ये बांबू प्रक्रिया करण्याची चाचणी सुरु असताना अपघाताने मशीनच्या दाराचे बोल्ट तूटून पडले व दार खुले होवून काही रसायन बाहेर पडले. तथापि, प्रक्रिये दरम्यान वापरण्यात येणारे. कॉपर क्रोम बोरान रसायन जवळपासच्या पाण्यात नदीस्त्रोतात गेलेले नाही. त्यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण झाला असे म्हणणे खरे नाही.

(३) व (४) नोव्हेंबर २०२१ चे दरम्यान श्री.मनोज मार्कंडेयराव वाहने, यांनी मूळ अर्ज क्र. १०७/२०२१ राष्ट्रीय हरित लवाद (वेस्टर्न झोन पुणे बेंच) मध्ये महाराष्ट्र बांबू विकास मंडळ व इतर ५ यांचे विरुध्द दाखल केलेला आहे. त्याअनुषंगाने राष्ट्रीय हरित लवादात उत्तर दाखल करणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आय.टी.आय. च्या ओबीसी, विमाप्र तथा विजेएनटी विद्यार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ मिळण्याबाबत

**(१७) १३५१७ (०४-०३-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आय.टी.आय. च्या ओबीसी विद्यार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ देण्याबाबत दिनांक २९ मे, २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून दिनांक २ ऑगस्ट, २०२१ रोजी सुधारित शासन निर्णय काढण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पहिल्या निर्णयान्वये विद्यार्थ्यांना दोन वर्षे लाभ मिळाला असून दुसऱ्या निर्णयान्वये ओबीसी, विमाप्र, व व्हिजेएनटी विद्यार्थ्यांना सुध्दा शुल्क प्रतिपुर्ती लाभ देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त शासन निर्णयानुसार ओबीसी, विमाप्र व्हिजेएनटी विद्यार्थ्यांनी अशासकीय आयटीआय मध्ये प्रवेश घेतला असून दिनांक २ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यादरम्यानपर्यंत कोणतेही पोर्टल सुरू करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ओबीसी विद्यार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ मिळावा यादृष्टीने आर्थिक तरतूद करुन शासन पोर्टल सुरु करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (१४-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) ओबीसी, व्हिजेएनटी व विमाप्र या प्रवर्गातील आयटीआय विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याची सुविधा महाडिबीटी प्रणालीवर दिनांक ०५/०३/२०२२ पासून उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

# करोना संसर्गाने राज्यातील महावितरण, महानिर्मिती व महापारेषण या वीज कंपन्यांतील मृत पावलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वारसदारांना सानुग्रह सहाय्य अदा करण्याबाबत

**(१८) १३५२५ (०२-०३-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरण, महानिर्मिती व महापारेषण या तीन वीज कंपन्यांमधील रिक्त असलेल्या नियमित पदांच्या जागी एकूण ३९,७५३ कंत्राटी कर्मचारी कार्यरत असून त्यांपैकी १२४ कर्मचाऱ्यांचा करोना संसर्गामुळे मृत्यू झाला असल्याचे दिनांक १४ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करोना संसर्गामुळे मृत झालेल्या महावितरणमधील ३८ कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी १२, महानिर्मितीमधील ६६ कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी ३८ आणि महापारेषण मधील २० कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी १६ कामगारांच्या वारसदारांना सानुग्रह सहाय्य अद्यापही अदा करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने करोना संसर्गाने राज्यातील महावितरण, महानिर्मिती व महापारेषण या वीज कंपन्यांतील मृत पावलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वारसदारांना सानुग्रह सहाय्य अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ.नितिन राऊत (१७-०३-२०२२) :** (१) राज्यातील महावितरण, महानिर्मिती व महापारेषण या तीन वीज कंपन्यांमधील रिक्त असलेल्या नियमित पदांच्या जागी एकूण इतके ३९,७५३ कंत्राटी कर्मचारी कार्यरत असून त्यापैकी आजमितीपर्यंत १२५ कंत्राटी कर्मचाऱ्यांचा करोना संसर्गामुळे मृत्यू झाला आहे.

(२) व (३) अ) महावितरण कंपनीमध्ये जानेवारी, २०२२ अखेरपर्यंत करोना संसर्गामुळे मृत झालेल्या ३८ कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी ३५ कंत्राटी कामगारांच्या कुटुंबीयांना सानुग्रह सहाय्य अदा करण्यात आले आहे. २ मृत कंत्राटी

कामगारांच्या कुटुंबीयांना सानुग्रह सहाय्याची रक्कम अदा करण्याबाबत महावितरण कंपनी स्तरावरून कार्यवाही सुरू आहे. १ प्रकरण अपात्र ठरले आहे.

ब) महानिर्मिती कंपनीमध्ये जानेवारी, २०२२ अखेर पर्यंत करोना संसर्गामुळे मृत झालेल्या ६६ कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी ५४ कंत्राटी कामगारांच्या कुटुंबीयांना सानुग्रह सहाय्य अदा करण्यात आले आहे. ०८ मृत कंत्राटी कामगारांच्या वारसदारांना सानुग्रह सहाय्य अदा करण्याची कार्यवाही कंपनी स्तरावरून सुरू आहे. ०४ प्रकरणे अटी व शर्तींची पुर्तता न केल्यामुळे अपात्र ठरली आहेत.

क) महापारेषण कंपनीमध्ये जानेवारी, २०२२ अखेर पर्यंत एकूण २१ मृत कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी ७ मृत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वारसांना सानुग्रह सहाय्य अदा करण्यात आले आहे. उर्वरित १४ प्रकरणांमध्ये मृत कंत्राटी कामगारांच्या वारसदारांना सानुग्रह सहाय्य अदा करण्याची कार्यवाही कंपनी स्तरावरून सुरू आहे.

(४) लागू नाही.

---

## समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी सेन्ट्रल किचन योजना लागू करण्याबाबत

**(१९) १३५३५ (०२-०३-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना शासकीय मानकानुसार पुरेसे, दर्जेदार, ताजे, पौष्टिक आणि सुरक्षित आहार देणे, त्यांचे सर्वांगीण आरोग्य सुधारणे, त्यांच्या शारीरिक, मानसिक आरोग्यात वृद्धी करून त्यांना चांगले शिक्षण घेता यावे या दृष्टीने सेन्ट्रल किचन योजना लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप व सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीस किती कालावधी अपेक्षित आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी सेन्ट्रल किचन योजना लागू करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१४-०३-२०२२) :** (१) होय.
(२) आदिवासी विकास विभागाच्या धर्तीवर मध्यवर्ती स्वयंपाकगृह (Central Kitchen) योजना राबविता येणे शक्य आहे का, याबाबत शक्यशक्यतांचा विचार करण्यात येत आहे.
(३) व (४) नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आपत्ती प्रवण जिल्ह्यांसाठी दिर्घकालीन निर्णय घेण्याबाबत

**(२०) १३५३८ (०२-०३-२०२२) श्री.विलास पोतनीस,श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) जारी केलेल्या आपत्तीप्रवण जिल्हानिहाय नकाशामध्ये राज्यातील पुणे, सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी आणि रायगड या जिल्ह्यांमध्ये अतिमुसळधार आणि अतितीव्र मुसळधार पावसाच्या सर्वाधिक घटना नोंदल्या गेल्याची बाब दिनांक १२ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सह्याद्रीलगतचे सदर जिल्हे सर्वाधिक अतिवृष्टीप्रवण असल्याचे सन १९५१ ते सन २०१९ या कालावधीतील आकडेवारीवरून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने उक्त आपत्ती प्रवण जिल्ह्यांसाठी शासनाने कोणते दीर्घकालीन निर्णय घेतले आहेत वा घेण्यात येणार आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२३-०३-२०२२) :** (१) होय, दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी भारतीय हवामान खात्याच्या क्लायमेट रिसर्च ॲण्ड सर्विसेस (CRS) कार्यालयाने भारताच्या आपत्ती प्रवणतेसंदर्भात अहवाल प्रसिध्द केला आहे.

(२) भारतीय हवामान विभागाकडून प्राप्त माहितीनूसार सन १९५१-२०१९ या दरम्यान सदर जिल्हयांमध्ये अतिमुसळधार आणि अतितीव्र मुसळधार पावसाचे प्रमाण साधारणत: ३२ ते ६३ दिवस आहेत.

(३) जलसंपदा विभागाकडून खालील उपाययोजना करण्यात येत आहेत.

पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर हे पूरामुळे प्रभावित होत असल्याने भीमा व कृष्णा नदीचे खोऱ्यात पडणाऱ्या पावसाचे मोजमाप करण्यासाठी Real Time Data Acquisition System (RTDAS) ही संगणकीय प्रणाली विकसित केली आहे.

महाराष्ट्रातील मुख्य नद्या, उपनद्यांवर आवश्यकतेनुसार पूरसंरक्षक भिंतीची कामे केली जातात. पूररेषेच्या आत बांधकाम न होण्यासाठी पूररेषेबाबतची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येते.

महाड, चिपळूण शहरातील पूरपरिस्थितीबाबत कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून सावित्री व वाशिष्ठी नदीतील गाळ काढून नदीचे खोलीकरण करण्याचे काम सुरु आहे.

जलसंपदा विभागांतर्गत येणाऱ्या धरणांचे Reservoir Operation Schedule हे अद्ययावत जलशास्त्रीय आकडेवारीच्या आधारे Dam Safety Manual च्या मार्गदर्शक सूचनांनुसार अद्ययावत करण्यात येतात. तसेच सन २००५, २००६ व २०१९ पूरपरिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी श्री.वडनेरे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. समितीने केलेल्या शिफारशी संबंधित विभागास कळविल्या आहेत. तसेच कोकणात येणाऱ्या आपत्तीचा सामना करण्यासाठी कायमस्वरुपी पायाभूत सुविधा निर्माण करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला असून रुपये ३२०० कोटींची तरतूद करण्यात येणार आहे.

या विभागाकडून पूरपरिस्थितीचा सामना करण्यासाठी संबंधित जिल्हयांना बोटी उपलब्ध केल्या आहेत. तसेच राज्यातील १५ पूरप्रवण जिल्हयातील स्थानिक लोकांना प्रशिक्षण देण्यासाठी आपदा मित्र कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्यात या ५ जिल्हयांचा समावेश आहे.

पावसाळयाच्या सुरवातीस कोल्हापूर/ सांगली याठिकाणी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या कंपन्या तैनात करण्यात येतात. पुणे येथील राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या कंपन्या अपुऱ्या पडल्यास आवश्यकतेनूसार देशाच्या अन्य भागातून राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या अतिरिक्त कंपन्या हवाईमार्गे मागविण्यात येतात. भूदल, वायूदल आणि नौदल तसेच कोस्ट गार्ड यांना देखील तयार राहण्याची विनंती करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.